जुलै २०२४ पर्यंत संपूर्ण मार्ग खुला केला जाणार

# येत्या फेब्रुवारीपासून भूयारी मेट्रोवर वेग चाचणी

**अतिक शेख/मुंबई**

येत्या फेब्रुवारीपासून भुयारी मेट्रोवर वेग चाचण्या सुरू होणार आहेत. ही चाचणी ३ किलोमीटरपर्यंत म्हणजेच सहार रोडपर्यंत घेण्यात येणार आहे.

सध्या सारीपूत नगर, आरे व मरोळ स्टेशन या पट्ट्यात ऑगस्टपासून मेट्रोच्या चाचण्या सुरू आहेत. आतापर्यंत प्रोटोटाईप मेट्रो ट्रेनच्या १ हजार किमी चाचण्या झाल्या आहेत, असे एमएमआरसीचे संचालक (प्रकल्प) सुबोध गुप्ता यांनी सांगितले. ही मेट्रो कुलाबा-वांद्रे-सीप्झ दरम्यान धावणार आहे. ही पूर्णपणे भुयारी आहे.

यंदाच्या ऑगस्टमध्ये मेट्रोचा प्रोटोटाईप आली. तेव्हा तिचा वेग १० किमी प्रति तास होता. आता या मार्गावर ६० ते ६५ किमी प्रति तास वेगाने मेट्रोची चाचणी घेण्यात येत आहे. वेग चाचण्या सुरू झाल्यावर ती ९५ किमी प्रति तास वेगाने धाववण्यात



येईल. या गाडीची सर्व रचना ९५ किमी वेगासाठी बनवली आहे. मात्र, प्रवासी वाहतुकीच्या वेळी तिचा जास्तीत जास्त वेग ८५ किमी असेल. सध्या सहार रोड स्टेशनजवळ रेल्वे मार्ग टाकण्याचे काम सुरू आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल २ पर्यंत मार्ग टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे.

प्रोटोटाईप चाचण्यानंतर आरडीएसओच्या निकषानुसार मेट्रोच्या वेग चाचण्या घेतल्या जातील. सुरक्षा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर प्रवासी वाहतुकीसाठी हा मार्ग खुला केला जाईल. डिसेंबर २०२३ पर्यंत आरे ते वांद्रे-कुर्ला संकुल तर जुलै २०२४ पर्यंत संपूर्ण मार्ग खुला केला जाणार आहे. सध्या मुंबईत ८ डब्यांची एक मेट्रो ट्रेन आहे. दुसरी ट्रेन डिसेंबरच्या मध्यावर येईल. अल्टॉम कंपनी ३१ मेट्रोचे ट्रेन बनवणार आहे. या ट्रेन प्रत्येक ८ डब्यांच्या आहेत.